# मंत्रिमंडळ निर्णय

## दिनांक : १७ एप्रिल २०१८

## ( बैठक क्र. १७३)

| अ.क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १. | शासनाने जुलै २०१६ मध्ये घेतलेला निर्णय<br>अनुदानास पात्र घोषित शाळांना ६५ कोटींचा निधी मिळणार | शालेय शिक्षण |
| २. | कृषिपंपांच्या उर्जीकरणासाठी उच्चदाब वितरण प्रणाली योजना | ऊर्जा |
| ३. | चित्रिकरणासाठीच्या परवानग्या आता एक खिडकी योजनेतून | सांस्कृतिक कार्य |
| ४. | राष्ट्रीय महामार्गावरील उड्डाणपुलांच्या भूसंपादनासाठी आता राज्याचा निधी | नगर विकास |
| ५. | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाच्या विविध कलमांमध्ये सुधारणेसाठी अध्यादेश | सहकार |

शालेय शिक्षण विभाग

शासनाने जुलै २०१६ मध्ये घेतलेला निर्णय

**अनुदानास पात्र घोषित शाळांना**
**६५ कोटींचा निधी मिळणार**

राज्य शासनाने जुलै २०१६ मध्ये घेतलेल्या निर्णयानुसार अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेल्या विनाअनुदान व कायम विनाअनुदानित तत्त्वावरील मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळांना सरसकट २० टक्क्यांप्रमाणे अनुदान देण्याचा निर्णय घेतला होता. या शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर पदांसाठी एप्रिल २०१८ ते मार्च २०१९ अशा १२ महिन्यांसाठी ६४ कोटी ९८ लाखाच्या अनुदानास आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

राज्य मंत्रिमंडळाच्या २४ नोव्हेंबर २००१ रोजी झालेल्या बैठकीमध्ये नवीन शाळांना परवानगी देताना कायम विनाअनुदान तत्त्वावर परवानगी देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. भविष्यात कधीही शासनाकडे अनुदानाची मागणी करणार नाहीत अशा आशयाचे हमीपत्र लिहून घेऊनच अशा शाळांना परवानगी देण्यात आली होती. मात्र, त्यानंतरच्या कालखंडात या शाळांना अनुदान लागू करण्याची मागणी सर्व संबंधित घटकांकडून वारंवार शासनाकडे करण्यात येत होती. ही बाब विचारात घेऊन या शाळांना अनुदानावर आणण्यासंदर्भात शाळांच्या मान्यता आदेशातील कायम हा शब्द २० जुलै २००९ च्या शासन निर्णयान्वये वगळण्यात आला. तसेच १५ नोव्हेंबर २०११ च्या शासन निर्णयानुसार या शाळांसाठी मुल्यांकनाचे निकष तयार करण्यात आले. या निकषांमध्ये १६ जुलै २०१३ च्या शासन निर्णयान्वये काही सुधारणा करण्यात आल्या.

या शाळांना अनुदान देण्याची मागणी विचारात घेऊन राज्य मंत्रिमंडळाच्या ३० ऑगस्ट २०१६ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये विनाअनुदान व कायम विनाअनुदान तत्त्वावर परवानगी दिलेल्या व मूल्यांकनात पात्र घोषित करण्यात आलेल्या मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळांना द्यावयाच्या अनुदान सूत्रामध्ये सुधारणा करण्यात आली. त्यानुसार शासनाच्या पुढील आदेशापर्यंत सरसकट २० टक्क्यांप्रमाणे अनुदान देण्याबाबतचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार १४ जून २०१६ पूर्वी अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेल्या १६२८ शाळा व २४५२ तुकड्यांवरील १९ हजार २४७ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना विहित अटी व शर्तीच्या अधिन राहून सरसकट २० टक्के अनुदान देण्याबाबत १९ सप्टेंबर २०१६ रोजी शासन निर्णय काढण्यात आला. या शाळांना १ फेब्रुवारी २०१७ च्या शासन निर्णयानुसार प्रत्यक्ष अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

दि. १ व २ जुलै २०१६ च्या शासन निर्णयानुसार १५८ प्राथमिक शाळा व ५०४ तुकड्यांवरील १४१७ शिक्षकांबरोबरच ६३१ माध्यमिक शाळा व १६०५ तुकड्यांवरील ६७९० शिक्षक व २१८० शिक्षकेत्तर अशा एकूण ८९७० पदांना अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेले आहे. या ८९७० पदांना एप्रिल २०१८ ते मार्च २०१९ या १२ महिन्यांसाठी २० टक्क्यांप्रमाणे ६४ कोटी ९८ लाख ६० हजार इतका निधी खर्च करण्यास आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.

-----o-----

## कृषिपंपांच्या उर्जीकरणासाठी
## उच्चदाब वितरण प्रणाली योजना

राज्यातील कृषिपंपांना उच्चदाब वितरण प्रणालीद्वारे विद्युत पुरवठा करण्याच्या योजनेस आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. या निर्णयानुसार मार्च २०१८ अखेर शुल्क भरलेल्या २ लाख २४ हजार ७८५ कृषिपंपांना अखंडित आणि योग्य दाबाने वीजपुरवठा होणार आहे.

नागपूर येथील विधानमंडळाच्या शीतकालीन सत्रात मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली १२ डिसेंबर २०१७ रोजी झालेल्या जिल्हानिहाय आढावा बैठकीमध्ये कृषिपंप ग्राहकांसाठी उच्चदाब वितरण प्रणाली राबविण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याचे आदेश देण्यात आले होते. सध्या प्रचलित पद्धतीनुसार या सर्व कृषिपंप ग्राहकांना वीज पुरवठा करण्यासाठी ६३ केव्हीए आणि १०० केव्हीए क्षमतेची विद्युत रोहित्रे उभारण्यात येतात. लघुदाब वाहिनीद्वारे एका रोहित्रावरून १५ ते २० कृषी ग्राहकांना विद्युत पुरवठा करण्यात येतो. मात्र, या उच्चदाब वितरण प्रणालीमुळे एका रोहित्रावरुन दोन शेतकऱ्यांना जोडणी मिळेल. त्यामुळे वीज पुरवठ्यासंदर्भात असलेल्या अनेक अडचणींचे निराकरण होणार आहे.

लघुदाब वाहिनीची लांबी वाढल्यामुळे ग्राहकांना कमी दाबाने वीज पुरवठा होणे, विद्युत पुरवठ्यामध्ये वारंवार बिघाड होऊन ग्राहकांचा वीज पुरवठा खंडित होणे, तांत्रिक वीजहानी वाढणे, रोहित्र बिघाड होण्याच्या प्रमाणामध्ये वाढ, विद्युत अपघात, लघुदाब वाहिनीवर आकडा (हूक) टाकून विद्युत चोरी करणे इत्यादी समस्यांना सामोरे जावे लागते. यामुळे अखंडित व शाश्वत वीज पुरवठा करण्याचे उद्दिष्ट साध्य होण्यास अडचणी येतात. या समस्येचे निराकरण करण्यासाठी राज्यातील कृषिपंपांना यापुढे उच्चदाब वितरण प्रणालीद्वारे (HVDS) वीज पुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे उच्चदाब वितरण प्रणालीमुळे अखंडित व शाश्वत वीज पुरवठा होण्यासह विद्युत हानी, अपघात आणि रोहित्र बिघाड या तिन्ही बाबींमध्ये घट होणार आहे. यामुळे रोहित्र नादुरुस्त होण्याचे प्रमाण अत्यंत कमी होणार असून अनधिकृत वीज जोडणी होणार नाही. मार्च २०१८ पर्यंत शुल्क जमा केलेल्या आणि प्रलंबित असलेल्या शेतकऱ्यांना या योजनेत जोडणी दिली जाणार आहे.

-----०-----

# चित्रिकरणासाठीच्या परवानग्या
# आता एक खिडकी योजनेतून

चित्रपट निर्मिती, दूरचित्रवाणी मालिका, जाहिरातपट व माहितीपट इत्यादींच्या चित्रिकरणासाठी आवश्यक असणाऱ्या विविध शासकीय परवानग्या एक खिडकी योजनेतून देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. सध्या ही योजना मुंबई आणि मुंबई उपनगर जिल्ह्यापुरती राबविण्यात येणार असून त्यानंतर त्याचा विस्तार करण्यात येणार आहे.

राज्यात मराठी, हिंदीसह इतर प्रादेशिक भाषेतील चित्रपट, दूरचित्रवाणी मालिका, जाहिरातपट, माहितीपट यांची मोठ्या प्रमाणावर निर्मिती होते. त्यांच्या चित्रिकरणासाठी आवश्यक त्या परवानग्या तातडीने उपलब्ध होण्यासह व्यवसाय सुलभतेसाठी (Ease of doing business) चित्रिकरणासाठीच्या परवानग्या एक खिडकी योजनेतून देण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे निर्मात्यांना शासकीय स्थळावरील चित्रिकरणासाठी लागणाऱ्या परवानग्यांबाबतचा निर्णय पंधरा दिवसांच्या आत कळणार आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी मुंबई येथील दादासाहेब फाळके चित्रनगरीमधील महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ सनियंत्रक राहणार असून ही योजना सेवा हमी कायद्यांतर्गत देखील आणण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्य शासनाच्या १४ विभागांतर्गत येणाऱ्या स्थळांचा यात समावेश करण्यात आला आहे.

निर्मात्यांनी एक खिडकी योजनेच्या माध्यमातून ऑनलाईन प्रणालीद्वारे सर्व अटी-शर्तींच्या पूर्ततेबरोबरच शुल्काचा भरणा केल्यास चित्रिकरणासाठी आवश्यक असलेल्या स्थळाबाबतच्या परवानगीची प्रक्रिया पूर्ण होईल. त्यानंतर सनियंत्रक संस्था संबंधित शासकीय यंत्रणेकडून परवानगी घेईल. संबंधित यंत्रणेने कार्यालयीन कामकाजाच्या सात दिवसांत कोणताही प्रतिसाद दिला नाही तर चित्रिकरणास हरकत नाही असे ठरवून परवानगी देण्यात येईल. यामध्ये कोणत्याही संस्थेला इतर कोणत्याही संस्थेच्या ना हरकत अथवा परवानगीची आवश्यकता भासणार नाही. सर्व यंत्रणांशी समन्वय साधूनच सनियंत्रक संस्थेमार्फत अंतिम परवानगी दिली जाणार आहे. चित्रिकरणासाठी एकदा परवानगी दिल्यानंतर त्या स्थळाबाबतचे आरक्षण रद्द करता येणार नाही किंवा त्याबाबतचे शुल्क परत केले जाणार नाही. मात्र, परवानगी मिळण्यापूर्वी अर्ज रद्द केला तर प्रक्रिया शुल्क वगळून उर्वरित रक्कम परत केली जाईल. यासाठी www.maharashtrafilmcell.com हे वेबपोर्टल तयार करण्यात आले आहे.

-----o-----

## राष्ट्रीय महामार्गावरील उड्डाणपुलांच्या भूसंपादनासाठी आता राज्याचा निधी

राष्ट्रीय महामार्गावरील उड्डाणपूल, रेल्वे मार्गाच्या वरुन अथवा खालून जाणाऱ्या रस्त्यांच्या (आरओबी, आरयूबी) उभारणीसाठी आवश्यक असणाऱ्या भूसंपादनासाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानातून निधी देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. या निर्णयामुळे नागरी क्षेत्रातील अशा स्वरुपाचे अनेक प्रकल्प मार्गी लागून राष्ट्रीय महामार्गांची कामे गतीने पूर्ण होतील.

राष्ट्रीय महामार्गावरील नागरी क्षेत्रातील उड्डाणपूल, आरओबी, आरयूबी यांच्या कामाच्या अनुषंगाने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाची (NHAI) वैधानिक जबाबदारी नसलेल्या जागा संपादित करून देण्याची प्राथमिक जबाबदारी त्या-त्या स्थानिक स्वराज्य संस्था, महानगरपालिकांची आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्था, महानगरपालिका यांनी टीडीआर (TDR) देऊन या जागा भूसंपादित करणे, त्यासाठी आवश्यक तेथे विकास आराखड्यात (Development Plan) बदल करण्याची कार्यवाही करणे गरजेचे असते.

केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्रालयांतर्गत येणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणामार्फत (NHAI) राज्यात सध्या राबविण्यात येत असलेल्या व भविष्यामध्ये राबविण्यात येणाऱ्या उड्डाणपूल, आरओबी (ROB), आरयूबी (RUB) प्रकल्पांसाठीच्या भूसंपादनासाठी या महाभियानातून निधी दिला जाणार आहे. विदर्भ व मराठवाड्यातील सर्व नागरी स्वराज्य संस्था (महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायती) तर उर्वरित क्षेत्रातील ड वर्ग महानगरपालिका व सर्व नगरपालिका, नगरपंचायतींच्या क्षेत्रांमध्ये हा निर्णय लागू राहणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांनी आवश्यक कार्यवाही करूनही जागा संपादित करणे शक्य नसल्याचे संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी प्रमाणित केल्यानंतर असे भूसंपादन राज्य शासनाच्या भूसंपादन धोरणानुसार करण्यात येईल. भूसंपादनासाठी द्यावयाच्या मोबदल्याची परिगणना राज्य शासनाच्या भूसंपादन धोरणामध्ये ठरविलेल्या दरानुसार करण्यात येईल. हा निधी उपलब्ध करून देताना वित्तिय आकृतीबंध निश्चित करण्यात आला आहे. यामध्ये सर्व पात्र महानगरपालिकांसाठी राज्याचा हिस्सा ७० टक्के राहणार असून ३० टक्के हिस्सा संबंधित महानगरपालिकांनी द्यावयाचा आहे. तसेच अ वर्ग नगरपरिषदांना ७५ टक्के, ब वर्ग नगरपरिषदांना ८५ टक्के तर क वर्ग नगरपरिषदा तसेच नगरपंचायती यांना ९० टक्के हिस्सा राज्य शासनाकडून दिला जाणार आहे. उर्वरित हिस्सा त्या-त्या स्थानिक स्वराज्य संस्थांनी उभारावयाचा आहे.

संबंधित जिल्हाधिकाऱ्यांमार्फत याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्यास राज्य शासन स्तरावरील राज्यस्तरीय प्रकल्प मान्यता समितीकडून मंजुरी देण्यात येईल. त्यानंतर शासन मान्यतेने प्रशासकीय मान्यता देण्यात येईल. नगरोत्थान महा अभियानामधून भूसंपादनासाठी निधी देण्याबाबतची ही तरतूद फक्त एक वेळ निधी देण्यापुरती (One Time Settlement) मर्यादित असेल व त्यानंतर न्यायालयाच्या किंवा इतर कोणत्याही आदेशामुळे अशा जमिनीच्या मोबदल्यात वाढ करण्याचे आदेश झाल्यास त्याची भरपाई या योजनेतून करण्यात येणार नाही. ती जबाबदारी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांची असेल.

-----o-----

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाच्या विविध कलमांमध्ये सुधारणेसाठी अध्यादेश

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण चार वर्षापूर्वी अस्तित्वात येऊनही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम-१९६० च्या कलम १६६ (४) मधील तरतुदीमुळे मुदत संपलेल्या संस्थांचे संचालक मंडळ कार्यरत राहिले आहे. असे संचालक मंडळ पदावरून दूर करून त्याठिकाणी प्राधिकृत व्यक्तींच्या नेमणुकीसाठी सहकारी संस्था अधिनियमाच्या विविध कलमांमध्ये सुधारणा करणे आवश्यक होते. या सुधारणांसंदर्भातील अध्यादेश काढण्यासाठी राज्यपालांना शिफारस करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम-१९६० चे कलम ७३ अअअ मधील पोटकलम (३) आणि कलम ७३ कब (१५) मध्ये सुधारणा करण्यासह कलम १६६ मधील पोटकलम (४) पूर्णपणे वगळण्यात येणार आहे. कलम ७३ अअअ मधील पोटकलम (३) मधील तरतूद ही निवडून आलेले सदस्य व पदाधिकारी यांच्यापुरती मर्यादित असून त्यामध्ये समिती सदस्यांची पदे केव्हा रिक्त होतील याबाबत स्पष्टता नव्हती. या सुधारणांनुसार पदाधिकाऱ्यांची मुदत समितीच्या मुदतीइतकीच असेल आणि समितीची मुदत समाप्त झाल्यावर सदस्यांनी समितीचे सदस्य म्हणून आपले अधिकार व पदे रिक्त केली असल्याचे मानण्यात येईल. त्याचप्रमाणे मुदत संपलेल्या कोणत्याही संस्थेच्या समितीची निवडणूक राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाकडून सहा महिन्याच्या कालावधीत घेण्यात येणार आहे. परंतु, निवडणुकीचा निकाल घोषित होईपर्यंत किंवा सहा महिने यापैकी अगोदर घडेल तोपर्यंत समितीला पद धारण करता येईल.

त्याचप्रमाणे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम-१९६० चे कलम ७३ अअअ मधील पोटकलम (३) मध्ये नवीन मजकूर समाविष्ट करणे, कलम ७३ कब (१५) मधील मूळ तरतूद वगळून नवीन तरतूद व परंतुके नव्याने समाविष्ट करणे तसेच कलम १६६ मधील पोटकलम (४) पूर्णपणे वगळण्याबाबतचे सन २०१८ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मांडण्यात आलेले विधेयक क्र. २६ मागे घेण्यासही मान्यता देण्यात आली.

-----०-----